लोकपत्र दिनांक 06/06/2023

नांदेड ग्रामीण

# मुखेड तालुक्यातील दरोड्याचा गुन्हा उकल

## एका आरोपीस अटक; स्थानिक गुन्हे शाखा, नांदेडची कामगिरी



**मुखेड/ता.प्रतिनिधी**

तालुक्यातील चांडोळा येथून भगणूरकडे जात असताना फिर्यादीस दोन मोटार सायकलवर पाच इसमांनी येवून फिर्यादीस कट मारुन मोटार सायकल खाली पाडून चाकूचा धाक दाखवून नगदी २ लाख २५ हजार रुपयाची बॅग व एक सॅमसंग कंपनीचा बायोमॅट्रीक टॅब असा एकूण २ लाख ४५ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल जबरीने चोरून नेला होता. ही घटना १ जून रोजी घडली. त्यावरुन मुखेड पोलिस ठाण्यात गुरनं. १७१/२०२३ कलम ३९४,३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिस सुत्रानुसार सदर गुन्ह्याचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेतील पथकातील अधिकारी यांना खात्रीशीर गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की पो.स्टे. मुखेड गुरनं. १७१/२०२३ कलम ३९४,३४ भादंवि मधील आरोपी नांदेड, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यामध्ये गुन्हा करुन पळून गेल्याचे माहिती मिळाल्याने सदर आरोपींचा शोध घेवून अटक करण्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सूचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक व्दारकादास चिखलीकर मार्गदर्शनाप्रमाणे स्थागुशाचे पोउपनि दत्तात्रय काळे व त्यांचे पथक सदर जिल्ह्यामध्ये आरोपीतांचा शोध घेवून गुन्ह्यातील आरोपी नामे सक्षम पि. गौतम ताटे, वय २० वर्ष रा. नांदेड यास ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्याने व त्याचे इतर चार मित्रांनी मिळून सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. सदर आरोपीकडून नगदी ९ हजार रुपये व एक मोबाईल ४० हजार रुपये असा एकूण ४९ हजार रुपयाचा मुद्देमाल त्याच्या ताब्यातून हस्तगत करण्यात आलेले आहे. नमूद आरोपीस पुढील तपासकामी पो.स्टे. मुखेड पोलिस स्टेशन येथे देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, खंडेराव धरणे, पो.नि. व्दारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दत्तात्रय काळे, पोकॉ. विलास कदम, गणेश धुमाळ, चापोहेकॉ. अर्जुन शिंदे, पोहेकॉ राजेंद्र सिटीकर, पोहेकॉ दिपक ओढणे यांनी पार पाडली आहे.

---

06/06/2023 सत्यप्रभा

## दरोडयाच्या गुन्ह्यातील आरोपीला अटक

# ४९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड,दि.५ (प्रतिनिधी)-** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुखेड पोलीस ठाणे हद्दीतील दरोडयाचा गुन्हा उकल करुन एका आरोपीस छत्रपती संभाजी नगर येथून अटक केली आहे. सदर आरोपीकडून नगदी नऊ हजार रूपये व ४० हजार रूपये किंमतीचा मोबाईल, असा एकूण ४९ हजार रूपयाचा मुद्देमाल त्याच्या ताब्यातून हस्तगत करण्यात आला आहे.

दि. एक जून रोजी मुखेड हद्दीत चांडोळा येथून भगणूरकडे जात असताना फिर्यादीस दोन मोटार सायकलवर पाच जणांनी येवून फिर्यादीस कट मारुन मोटार सायकल खाली पाडून चाकूचा धाक दाखवून नगदी दोन लाख २५ हजार रुपयाची बॅग व एक बायोमॅट्रीक टॅब असा एकूण दोन लाख ४५ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल जबरीने चोरून नेला होता. याप्रकरणी मुखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, वरिष्ठांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक चिखलीकर यांनी पथके तयार करुन छत्रपती संभाजीनगर येथे आरोपी सक्षम गौतम ताटे, (२०) यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्याने व त्याचे इतर चार मित्रांनी मिळून सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. नमूद आरोपीस पुढील तपासकामी मुखेड पोलीस ठाण्यात देण्यात आले आहे. पथकाचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी कौतुक केले आहे.